**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७९ दिनांक २८/१०/२०२३**

# खूनाच्या गुन्ह्याची उकल करण्यात पालघर पोलीसांना यश

दिनांक ०६/०६/२०२३ रोजी सफाळे पोलीस ठाणे येथे यातील फिर्यादी मदन बहादुरसिंग बिक यांनी फिर्याद दिली की, फिर्यादी यांची आई श्रीमती पद्मा बहादुरसिंग बिक वय ५७ वर्षे, रा. सी/४०५ ॲस्टर बिल्डींग ९ स्टार लॅण्डमार्क माकणे ता. जि. पालघर मौजे मांडे गावातील मुजबादेवी मंदिराचे समोर रोडचे पलीकडे ३०० मीटर अंतरावर प्रसन्ना ठाकूर यांचे मालकीचे शेतजमीनीमध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन फिर्यादीची आई यातील मयत हिचा ओढणीचे सहाय्याने गळा आवळून खुन करून तिचे प्रेत पुरावा करण्याच्या उद्देशाने वरील नमूद ठिकाणी टाकून पळून गेलेले आहेत म्हणून सफाळा पोलीस ठाणे येथे गुरनं I ५०/२०२३ भादविसं कलम ३०२, ३९७, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग या करत आहेत.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांनी श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचेसोबत श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना तीन वेगवेगळी तपास पथके तयार करुन तपासाबाबत सुचना दिल्या.

सदर पथकांनी तांत्रीक पुराव्यांच्या आधारे कोणतेही धागेदोरे नसतांना सखोल व कौशल्यपुर्ण तपास करुन संशयीत इसम १) राजेश बिजीरे सोनार वय २१ वर्षे, रा. सफाळा, २) करण मान सिंग वय ३० वर्षे रा. सफाळा यास ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता वर नमुद दोन्ही आरोपीतांनी त्यांचा आणखी एक साथीदार याचेसह मयत श्रीमती पद्मा बहादुरसिंग बिक वय ५७ वर्षे, हिचे अंगावरील सोन्याचे दागिने चोरण्याचे उद्देशाने तिचा गळा दाबून खून केल्याचे निष्पन्न झाले. वरील नमुद गुन्ह्यात आरोपीस अटक केलेले आहे. गुन्ह्याचा अधिक तपास हा श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग या करत आहेत.

सदरची कामगीरी ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा,पालघर, पोनि/अविनाश मांदळे, प्रभारी अधिकारी, सफाळा पोलीस ठाणे, सपोनि/अमोल गवळी, पोउपनि/गणपत सुळे, पोउपनि/सावंतदेसाई तसेच स्थानिक गुन्हे शाखा, पालघर व सफाळा पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार यांचे पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.